SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५
Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ No - 1250 दि. 01 FEB 2024

# परिपत्रक

**तात्काळ/महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-** महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेल्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जांची तात्काळ पडताळणी करणेबाबत...

**संदर्भ:-** मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे जा.क्र.विससं/उशि/कोवि/शिष्य विभाग/२०२३-२४-३३५, दि.१६/०१/२०२४ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भांकित पत्रास अनुसरून **महाडिबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या महाविद्यालयीन स्तरावरील प्रलंबित अर्जांवर तात्काळ कार्यवाही करावी.** त्यासंदर्भाने महाडीबीटी पोर्टलवरील **कोल्हापूर विभागाची दि. २७/१२/२०२३ रोजीची वस्तुस्थिती** पुढे नमूद केली आहे.

| विभागाचे नाव | महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | दुसऱ्या हप्त्यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२० -२१ | २०२१ -२२ | २०२२ -२३ | २०१९ -२० | २०२० -२१ | २०२१ -२२ | २०२२ -२३ |
| कोल्हापूर | २९ | ४९ | ३४९ | १८३६ | १६५७ | ९०८ | ८३९१ |

तरी सोबत जोडलेले संदर्भांकित पत्र अवलोकनी घेवून **विहित कालमर्यादेत** विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयांनी आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून **त्वरीत** करावी.

कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय स्तरावर एकही शिष्यवृत्ती अर्ज प्रलंबित राहणार नाही तसेच पडताळणी करिता प्रलंबित राहिलेल्या अर्जांबाबत भविष्यामध्ये उद्भवणाऱ्या बाबीस संबंधित महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहिल याची नोंद घ्यावी.

कळावे,

आदेशान्वये

श्री. विलास एस. सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

**सोबत- वरीलप्रमाणे**

---

16 JAN 2024
INWARD SECTION
56

# महाराष्ट्र शासन

## विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४
E-mail: jdhekop@gmail.com/jdhescholarship2@gmail.com
फोन नं. (०२३१) २५३५४००/२५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

T-2

जा.क्रं.विससं/उशि/कोवि/शिष्य विभाग /२०२३-२४ - ३३५ दिनांक- १६.०१.२०२४

प्रति,

१. कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

२. प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित
कला,वाणिज्य,विज्ञान,विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर

**विषय - महाविदयालय स्तरावर प्रलंबित असलेल्या विदयार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जाची तात्काळ पडताळणी करणेबाबत.**

**संदर्भ - कं.उशिसं/शिष्य/ डीबीटी/ईमेल, दि. ०८.०१.२०२४**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की , महाडीबीटी पोटल वरील शिष्यवृत्तीकरिता विदयाथ्यानी भरलेल्या अर्जाची शैक्षणिक संस्था तसेच महाविदयालय स्तरावरुन तात्काळ पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि दि.२७.१२.२०२३ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड अहवालानुसार सन २०१९-२०,सन २०२०-२१, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ मधील खालीलप्रमाणे विभागनिहाय पडताळणी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहेत.

| अ.क. | विभागाचे नाव | महाविदयालय स्तरावर प्रलंबित अर्जाची संख्या | | | दुस-या हप्त्यासाठी महाविदयालय स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
| १ | कोल्हापूर | २९ | ४९ | ३४९ | १८३६ | १६५७ | ९०८ | ८३९१ |

महाडीबीटी पोटलवरील शिष्यवृत्तीसाठी विदयार्थ्यांनी भरलेल्या अर्जावर रोजच्या रोज कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच विदयार्थ्यांना दुस-या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विदयार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविदयालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविदयालय स्तरावर विदयाथ्याचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदरहू पडताळणी करीता प्रलंबित राहिलेल्या अर्जाबाबत भविष्यामध्ये उदभवणा-या प्रश्नास संबंधित विदयापीठाबाबत कुलसचिव /महाविदयालयातील प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.

विभागीय सहसंचालक, (उ.शि.)
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- १. मा. शिक्षण संचालक ,उच्च् शिक्षण ,पुणे यांना माहितीस्त्व सादर